# घटक: भारतीय भांडवल बाजार

अर्थ: ⇒ भांडवल बाजार म्हणजे अशी संस्थात्मक यंत्रणा जेथे मध्यमकालीन (१ ते ५ वर्षे) तसेच दीर्घकालीन (५ वर्षापेक्षा जास्त) कर्जाच्या देवाणघेवाणीचे व्यवहार चालतात.

⇒ भांडवल बाजारात उद्योजक व्यावसायिक आपले शेअर्स, बॉन्डस इ. विकून दीर्घकालीन भांडवलाची उभारणी करतात. हा पैसा कायमस्वरूपी उत्पादक भांडवलात गुंतवला जातो.

रचना: प्रमुख प्रकार- चार

1) गिल्ट एज्ड बाजार 2) औद्योगिक रोखे बाजार 3) विकास वित्तीय संस्था 4) वित्तीय मध्यस्थ संस्था

## 1) गिल्ट एज्ड बाजार

⇒ सरकारी व निमसरकारी रोख्यांच्या खरेदी विक्रीच्या बाजारास. यामार्फत केंद्र, राज्य किंवा स्थानिक सरकारे दीर्घकालीन कर्जे उभारतात.

## 2) औद्योगिक रोखे बाजार

⇒ ज्या बाजारात उद्योग व्यवसाय इ. स्थापन करण्यासाठी कंपन्या आपले शेअर्स, डिबेंचर्स, बॉन्डस इ. विकून दीर्घकालीन भांडवल उभारणी करतात त्यांना - - - - -

याचे दोन विभाग:

① नवरोखे बाजार: नव्या प्रतिभूतींचा बाजार किंवा प्राथमिक भांडवल बाजार असे म्हणतात. पहिल्यांदाच प्रचलित करण्यात येणारे शेअर्स, बॉन्डस इ.चा समावेश.
वापर → नविन तसेच विद्यमान कंपन्या उद्योग स्थापनेसाठी किंवा विस्तारासाठी

② विद्यमान रोखे बाजार: जुन्या प्रतिभूतींचा बाजार किंवा दुय्यम भांडवल बाजार असे म्हणतात. एकदा प्रचलित झालेल्या नव रोख्यांची खरेदी विक्री याजाच रोखे बाजार म्हणजेच Stock Market म्हणतात.

## 3) विकास वित्तीय संस्था

### ⊛ भारतीय औद्योगिक वित्त महामंडळ - (Industrial Finance Corporation of India)

स्थापना - IFCI — मध्यवर्ती बँकिंग चौकशी समितीच्या शिफारशींच्या आधारावर.
⇒ IFCI कायदा 1948 — 1 जुलै 1948
⇒ देशातील पहिली विकास बँक: मुख्यालय नवी दिल्ली

कार्ये ⇒ मध्यम व मोठ्या उद्योगांना (सार्व. किंवा खाजगी) वित्तीय तसेच बिगर वित्तीय सहाय्य.

वित्तीय मदतीची पद्धती:

अ) एक कोटी रु. पर्यंतची व २५ वर्षापर्यंतच्या कालावधीची कर्जे.
ब) परकीय चलनातील कर्जे
क) तांत्रिक, व्यवस्थापकीय, प्रशासनविषयक, विपणनविषयक, मार्गदर्शन व सल्ला.

Scanned by CamScanner

- NPA's चे प्रमाण वाढल्याने IFCI- आजारी वित्तिय संस्था.
- 1 जुलै 1993 रोजी IFCI महामंडळाचे रुपांतर 1956 च्या कंपनी कायद्यांतर्गत सार्वजनिक मर्यादित कंपनीत करण्यात आले. असे रुपांतर झालेली वित्तिय क्षेत्रातील पहिली संस्था शेअर्स विकून पैसा उभारण्याची संमती मिळाली.

## भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ.

(Industrial Credit and Investment Corporation of India.) ICICI

स्थापना: 5 जाने. 1955 – भारत सरकार, जागतिक बँक व खाजगी व्यक्ती यांच्या सहकार्यातून भारतीय कंपनी कायदा 1956 अंतर्गत एक सार्वजनिक मर्यादित कंपनी म्हणून खाजगी क्षेत्रात. कार्य - 18 एप्रिल 1955 पासून. मुख्यालय - बडोदा.

स्थापना: खाजगी उद्योगांना कर्जपुरवठा करण्यासाठी मात्र सर्व क्षेत्रांना कर्जे दिली.

- 1994 मध्ये: ICICI ने ICICI बँक खाजगी बँक स्थापन केली.
- 2002 मध्ये ICICI चे विलीनीकरण ICICI बँक मध्ये. या विलीनीकरणाला Reverse Merger असे म्हणतात. - या विलीनीकरणाने ICICI बँक देशातील पहिली वैश्विक बँक ठरली.

## भारतीय औद्योगिक विकास बँक

(Industrial Development Bank of India - IDBI)

स्थापना: IDBI- कायदा 1964- RBI च्या संपूर्ण मालकीची संलग्न संस्था. कॅनडातील औद्योगिक विकास बँकेच्या धर्तीवर.

1975- कायद्याने भारत सरकारने स्वतःच्या ताब्यात घेतले.

16 Feb 1976 - स्वायत्त वैधानिक संस्थेत रुपांतर.

मुख्यालय- मुंबई.

स्वरूप: औद्योगिक विकास बँकांची शिखर संस्था म्हणून – नियंत्रण व पुनर्वित्त सेवा.

कार्ये - IDBI - उद्योगधंद्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वित्तपुरवठा करते.

प्रत्यक्ष ⟶ ① उद्योगसंस्थांना कर्जे.
② भाग व कर्जरोखे खरेदी करणे.
③ हुंड्यांच्या वटणीचे व्यवहार
④ कर्जाची हमी.

अप्रत्यक्ष ⟹ उद्योग क्षेत्राला प्रत्यक्ष वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांना पुनर्वित्तपुरवठा.

2004 मध्ये IDBI कायदा रद्द – विकास वित्तीय संस्थेचे बँकिंग कंपनीत रुपांतर

11 ऑक्टो 2004 - IDBI ला अनुसूचित बँकेचा दर्जा.

2005 मध्ये - IDBI बँकेचे रुपांतर IDBI मध्ये.

## भारतीय औद्योगिक गुंतवणूक बँक मर्यादित

(Industrial Investment Bank of India)

स्थापनेचे 3 टप्पे: 1971 - IRCI Ltd - Industrial Reconstruction Corporation of India Ltd चीस्थापना. आजारी उद्योगांना कर्जपुरवठा.

1984 - IRBI कायदा 1984 IRCI चे रुपांतर 1985 पासून IRBI - Industrial Reconstruction Bank of India मध्ये.

27 मार्च 1997 : IRBI चे रुपांतर IIBI या पूर्ण विकास बँकेत. नोंदणी 1956 च्या कंपनी कायद्यांतर्गत सार्व. मर्यादित कंपनी. - सरकारच्या पूर्ण मालकीची संस्था.

मुख्यालय - कोलकाता.

कार्ये. ⇒ विकास बँकेची कार्ये: उदा. प्रकल्प वित्त पुरवठा, सेवा, कर्ज, हमी, मर्चंट बँकिंग.

## भारतीय लघु उद्योग विकास बँक

(Small Industries Development Bank of India)

स्थापना. SIDBI कायदा 1989 अंतर्गत 2 एप्रिल 1990 या दिवशी IDBI च्या संपूर्ण मालकीची संलग्न संस्था.

सप्टें 2000 मध्ये SIDBI कायद्यात सुधारणा करून IDBI पासून विभक्त करण्यात आले. - मुख्यालय - लखनौ.

कार्ये. अ) लघु उद्योग क्षेत्रासाठी उद्योगसंस्थांचे प्रवर्तन, वित्तपुरवठा व विकासासाठी मुख्य वित्तीय संस्था,

ब) लघु उद्योगांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांच्या (व्यापारी बँका, SFCs, SIDCs इ.) कार्यपद्धतीत सुसूत्रीकरण घडवून आणणे.

## पायाभूत सुविधा विकास वित्त महामंडळ

(Infrastructure Development Finance Corporation) IDFC

स्थापना: कंपनी कायदा 1956 नुसार 1997 मध्ये

कार्ये: अ) पायाभूत उद्योगांना वित्तपुरवठा उदा. वीजनिर्मिती, रस्ते, रेल्वे, बंदरे, दूरसंचार, पाणी इ.

## उत्तरपूर्वीय विकास वित्त महामंडळ लि

(North-Eastern Development Finance Corporation Ltd) NEDFi

स्थापना - 9 ऑ. 1995

मुख्यालय - गुवाहाटी (आसाम)

कार्ये: उत्तरपूर्व विभागात उद्योग, पायाभूत सुविधा, शेती, शेतीव्यवसाय इ.चा विकास.

# राज्यस्तरीय औद्योगिक वित्तपुरवठा संस्था

### 1) राज्य वित्तीय महामंडळे. (State Finance Corporation)

→ लघु व मध्यम उद्योगांना कर्जपुरवठा करणारी राज्य स्तरावरील संस्था.

→ राज्य वित्तीय महामंडळे कायदा 1951 (SFC's Act 1951) संमत 1 ऑगस्ट 1952 पासून लागू

= सर्वप्रथम 1953 मध्ये पंजाब राज्य वित्तीय महामंडळाची स्थापना.

= सध्या देशात 18 SFCs.

Scanned by CamScanner

① महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ : (महावित्त) (Maharashtra State Finance Corporation)

स्थापना - १ एप्रिल १९६२.

कार्यक्षेत्र - महाराष्ट्र, गोवा, दिव, दमन.

कार्ये → १) लघू व मध्यम उद्योगांना दीर्घकालीन कर्जपुरवठा - ६० लाख रु पर्यंत.
उद्योग उभारण्यासाठी - आवश्यक स्थिर भांडवल गुंतवणूकीसाठी (जमीन, इमारत, यंत्र...)
२) औद्योगिक दृष्ट्या मागास भागाचा विकास घडवून आणणे.
३) आजारी उद्योगांना पुनर्वित्तपुरवठा.

② राज्य औद्योगिक विकास महामंडळ (State Industrial Development Corporation : SIDC)

स्थापना : १९५६ च्या कंपनी कायद्यांतर्गत - राज्य सरकारची मालकी.
राज्यातील मध्यम व मोठ्या उद्योगांचे प्रवर्तन व विकास करण्यासाठी
⇒ उद्योगांना विविध प्रकारे मदत - दीर्घकालीन प्रकल्प वित्तपुरवठा, कर्जाची हमी, कर्जरोख्यां खरेदी.
⇒ सध्या देशात २८ SIDCs.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (Maharashtra Industrial Development Corporation MIDCs)

स्थापना : १ ऑ. १९६२

कार्य : राज्याचा सुनियोजीत व सुव्यवस्थित औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक वसाहतींची उभारणी करणे.
अविकसित भागात उद्योगधंद्याची वाढ

कार्यपद्धती : उद्योजकांना औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते, पाणी, वीज इ. सुविधा देणे

सध्या महाराष्ट्रात : १) विकास केंद्राची स्थापना.
२) केंद्र शासन सहाय्यीत विकास केंद्राची स्थापना.
३) सर्व तालुक्यांत लहान औद्योगिक केंद्राची स्थापना.
४) पंचतारांकित औद्योगिक क्षेत्राची स्थापना.

③ राज्य लघु उद्योग विकास महामंडळ (State Small Industries Development Corporation)

लघु उद्योगांच्या विविध गरजा भागविण्यासाठी राज्य सरकारच्या मालकीच्या संस्था म्हणून SSIDCs ची स्थापना १९५६ च्या कायद्याने.

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ : (Maharashtra Small scale Industry Development Corporation - MSSIDC)

स्थापना - १९६२

कार्ये : १) कच्च्या मालाची खरेदी वाटप
२) बाजारपेठ
३) गोदाम
} उपलब्धता
४) आयात निर्यात सहाय्य.
५) हस्तकला कारागिरांना मदत.
६) प्रदर्शने आयोजित करणे.
७) लघुउद्योग नावाचे मासिक.

Scanned by CamScanner

४) महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ :
(State Industrial & Investment Corporation of Maharashtra - SICOM)
स्थापना - ३१ मार्च १९६६ :
कार्ये - मागास भागात उद्योग प्रसारासाठी वित्तीय तसेच बिगर वित्तीय मदत करणे.
उद्योगधंद्याचे विकेंद्रिकरण करणे.

## * राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक *
(National Bank For Agriculture & Rural Development - NABARD)

पार्श्वभूमी: नाबार्डच्या स्थापनेपूर्वी कृषी पतपुरवठ्याचे कार्य RBI कडे.
RBI चे दोन विभाग - 1) कृषी पत विभाग.
२) ग्रामीण नियोजन व पतकक्ष.
RBI ने १९६३ मध्ये * कृषी पुनर्वित्त महामंडळाची स्थापना.
१९७५ मध्ये कृषी पुनर्वित्त आणि विकास महामंडळात रूपांतर
} पुढे या दोन विभागाचे एकत्रिकरण नाबार्डमध्ये.

१९७९ मध्ये RBI ने श्री. बी शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली 'कृषी व ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक पतव्यवस्थेसाठी आढावा समिती. (CRAFICARD) स्थापन
त्या समितीच्या शिफारशीनुसार - NABARD Act - 1982 संमत
स्थापना - १२ जुलै 1982

भागभांडवल: सुरुवातीचे अधिकृत भांडवल ⟹ ५०० कोटी
भाग भांडवल ⟹ १०० कोटी (भारत सरकार/RBI = 50/50)
नाबार्ड सुधारणा कायदा: २००० नुसार जाने २००१ पासून अधिकृत भांडवल २००० कोटी.

नाबार्डचे निधी :
१) राष्ट्रीय ग्रामीण पत निधी (दीर्घकालीन कार्ये)
२) राष्ट्रीय ग्रामीण पत निधी (स्थैर्य)
३) ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF)

नाबार्डची कार्ये:

1) शिखर संस्था म्हणून: - पतगरजा संबंधी धोरण व नियोजन
२) पुनर्वित्त —॥— - प्रत्यक्ष वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांना पुनर्वित्त पुरवठा.
३) प्रत्यक्ष वित्त पुरवठा / पुनर्वित्त पुरवठा.

- दीर्घकालीन (3 ते 5 वर्षे)
  - ग्रामीण, कृषिविकास, राज्य सहकारी व्यापारी, नागरी सहकारी, NBFC
- अल्पकालीन / मध्यम कालीन (१ ते 3 वर्षे)
  - राज्य सहकारी, ग्रामीण, सार्वजनिक, जि. मध्य बँका

प्रत्यक्ष वित्त पुरवठा → फळ फार्मस, प्रोसेसिंग युनिट्स, गोदामे, शीतगृहे, विपणन संघ, राज्य सरकारे, राज्य सहकारी बँका, जि. मध्य सह बँका यांना.

(4) ग्रामीण बँका, राज्य सह बँका, जि. मध्य बँका यांची तपासणी.
राज्य भूविकास बँका, विणकरांच्या शिखर सोसायट्या, विपणन संघ यांची -

(5) स्वयं सहायता गटांना- सूक्ष्म पत पुरवठा करणे. त्यासाठी पुनर्वित्तपुरवठा.

## * भारताची आयात निर्यात बँक * (Export - Import Bank of India) EXIM BANK.

स्थापना: - एक्झिम बँक ऑफ इंडिया ॲक्ट 1981 द्वारे 1 जाने 1982.

मालकी - भारत सरकार- संपूर्ण

मुख्यालय- मुंबई

स्वरूप - आंतरराष्ट्रीय वित्त पुरवठा क्षेत्रातील शिखर बँक.

① आयात निर्यात व्यापारास वित्तपुरवठा करणाऱ्या सर्व संस्थांच्या कार्यात व कार्यपद्धतीत सुसूत्रता घडवून आणणे.

② अशा संस्थांना पुनर्वित्त सेवा पुरविणे.

कार्ये. ① वित्तिय मदत: प्रत्यक्ष वित्तपुरवठा, पुनर्वित्तपुरवठा, आंतरराष्ट्रीय हुंड्यांना स्वीकृती.

② बिगर वित्तिय : तांत्रिक प्रशासकीय मदत, परकीय बाजारपेठांबद्दल माहिती.

## * भारतातील विमा क्षेत्र *

विमा ⇒ व्याख्या ⇒ विमा हा एक करार असून त्यातील एक पक्ष विशिष्ट मोबदला घेवून दुसऱ्या पक्षाच्या त्याच्या जीविताची अथवा वस्तूची अकस्मीकपणे हानी झाल्यास त्यासंबंधीची नुकसान भरपाई करून देतो.

महत्त्व ⇒ ① संकटाची तीव्रता कमी होते.

② जोखीम आपापसात वाटून घेतली जाते.

③ सक्तीच्या बचतीची सवय लागते.

④ विमा कंपन्या हप्त्यातून गोळा केलेल्या रकमेतून उद्योगधंद्यांना कर्ज देतात.

भारतात तीन क्षेत्रात विमा व्यवसाय ① जीवन ② आरोग्य ③ साधारण

यावरून 2 प्रकार- जीवन विमा (① जीवन, ② आरोग्य); साधारण / बिगर जीवन विमा (③ साधारण) → अग्नी / सागरी / मोटार वाहन.

Scanned by CamScanner

जीवन विमा ⇒ Life Insurance

* विविध जोखीमांपासून संरक्षण (मृत्यू, आजार, अपघात)

उत्क्रांती ⇒ विमा व्यवसाय सर्वप्रथम भारतात ब्रिटिशांनी आणला.

१८१८ - कलकत्ता - ओरिएन्टल लाईफ इन्शुरन्स

१८२३ - बॉम्बे - बॉम्बे लाईफ इन्शुरन्स

१८७० - जीवन विमा स्थापन करण्याचा पहिला संघटित प्रयत्न बॉम्बे म्युच्युअल लाईफ इन्शुरन्स सोसा.लि.

१८७४ - ओरिएन्टल गव्हर्नमेंट सिक्युरिटी ॲश्युरन्स कंपनी: संघटीत विमा व्यवसाय प्रसार

१९१२ - भारतीय विमा कंपनी कायदा १९१२

१९२८ - भारतीय विमा कंपनी कायदा १९२८

१९३८ - दोन्ही कायद्याचे एकत्रिकरण - विमा कायदा १९३८ (सध्या अस्तित्वात)

१९५६ - २४५ विमा कंपन्या (१५४ भारतीय + १६ परकीय + ७५ प्रॉव्हिडंट कमिट्या)

१९५६ - जीवन विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण:

२० जाने १९५६ - अध्यादेशाद्वारे भारत सरकारने २४५ विमा कंपन्या ताब्यात घेतल्या व त्याचे एकत्रिकरण करून १ सप्टे १९५६ ⇒ भारतीय जीवन विमा महामंडळाची (LIC ची) स्थापना. - त्यासाठी LIC कायदा १९५६ - संमत.

भारतीय जीवन विमा महामंडळ. - (LIC of India)

मुख्यालय - मुंबई नाव 'योगक्षेम'

१९५६ ते २००० - या काळात LIC ची व्यवसायात मक्तेदारी.

२००० मध्ये IRDA Act 1999 खाजगी क्षेत्रास विमा व्यवसाय खुला केल्याने व्यवसायातील हिस्सा कमी.

साधारण विमा (General Insurance)

⇒ जीवनासंबंधी जोखीमाव्यतिरिक्त ⇒ अग्नी / सागरी / मोटारवाहन / इतर.

उत्क्रांती: भारतात ब्रिटिशांनी आणला.

१८५० - कलकत्ता - ट्रायटन जबरल इन्शुरन्स कंपनी लि. - पहिली साधारण विमा कंपनी.

१९७२ - पर्यंत भारतात १०७ खाजगी भारतीय तसेच परकीय साधारण विमा कंपन्या

१९७२ - साधारण विमा व्यवसाय राष्ट्रीयीकरण कायदा - १९७२

भारत सरकारने १०७ कंपन्या ताब्यात घेतल्या. त्यांचे एकत्रिकरण करून त्यापासून ४ साधारण विमा कंपन्या स्थापन करण्यात आल्या.

N ① नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि. → कोलकाता

O ② ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि → दिल्ली

U ③ युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.लि → चेन्नई

N ④ न्यू इंडिया अश्युअरन्स कं.लि → मुंबई

} चार कंपन्यांची होल्डींग कंपनी म्हणून भारतीय साधारण विमा महामंडळाची (GIC of India) स्थापना १९५६ कायद्यानुसार १९७२ रोजी.

Scanned by CamScanner

चार कंपन्या GIC च्या संलग्न संस्था बनल्या. ००८

GIC — मुख्यालय - मुंबई - नाव - सुरक्षा.

कामे - 1) विमा व्यवसाय — नियंत्रण

2) विमा व्यवसाय — पर्यवेक्षण

3) व्यवसायासंबंधी धोरणे तयार करणे.

4) कंपनी क्षेत्रास वित्तीय पुरवठ्याचे कार्य.

GIC कडे प्रत्यक्ष विमा व्यवसायाचे कार्य नसते (अपवाद - कृषी / हवाई / सरकारी विमा योजना)

IRDA-Act 1999 - विमाक्षेत्र खुले (खाजगी क्षेत्रास)

३ नोव्हें २०००- चार विमा कंपन्या विभक्त

GIC ला भारताची पुनर्विमेकरी (Indian Reinsurer) म्हणून घोषित.

GIC कडून प्रत्यक्ष विमा व्यवसाय काढून घेण्यात आले

29 मार्च २००२ रोजी १९७२ कायद्यात सुधारणा करून GIC ची मालकी सरका

⇒ विभक्त झालेल्या ४ कंपन्यांनी GIPSA (General Insurance Public sector Association of India) संघटना स्थापन केली.

विमा क्षेत्र सुधारणा :

एप्रिल १९९३ ⇒ आर. एन. मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली - विमा क्षेत्र सुधारणा समिती

७ जाने १९९४ ⇒ अहवाल. शिफारशी :

① विमा क्षेत्र खाजगी क्षेत्रास खुले करावे. (एकाच कंपनीस जीवन विमा व साधारण विमा व्यवसाय करण्याची संमती देण्यात येवू नये)

② नवीन कंपनीचे भाग भांडवल किमान १०० कोटी.

③ परकीय विमा कंपन्यांना परवानगी द्यावी पण त्यांनी भारतीय प्रवर्तकांबरोबर संयुक्त व्यवसाय सुरु करावा.

④ चार संलग्न कंपन्या GIC पासून विभक्त कराव्यात. GIC ने पुनर्विमेकरी रहा

⑤ विमा क्षेत्राच्या नियमनासाठी रेग्युलेटरी ऑथॉरिटी स्थापन करावी.

IRDA Act-1999 : Insurance Regulatory And Development Authority

① विमा क्षेत्र खाजगी क्षेत्रास खुले करण्यात आले.

② २६% परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीस मान्यता.

③ १९ एप्रिल २००० रोजी विमा क्षेत्राचे नियमन करण्यासाठी IRDA ची निर्मिती - मुख्यालय - हैद्राबाद

काही घडामोडी :

① 2000 - ICICI प्रुडेन्शियल व HDFC स्टॅन्डर्ड लाईफ पहिल्या दोन खाजगी जीवन विमा कंपन्या

② २००१ - रॉयल सुंदरम अलायन्स - पहिली खाजगी साधारण विमा कंपनी.

③ २००२ - बँकांना विमा सेवा देण्यास संमती

④ जाने २०१८ - ५२ विमा कंपन्या : २४ जीवन विमा + २८ साधारण विमा.

Scanned by CamScanner

मार्च २०१६ - ४९% पर्यंत परकीय गुंतवणुकीस संमती.

भारतीय कृषी विमा कंपनी मर्या. Agricultural Insurance Company of India Ltd - AICIL

२० डिसें २००२ - कृषी विम्यासाठी स्वतंत्र कंपनी. (GIC + संलग्न संस्था + नाबार्ड यांनी मिळून)
GIC चे कृषी विम्याचे काम AICIL कडे हस्तांतरीत.

## * म्युच्युअल फंड्स / परस्पर सहयोग निधी. *

- ट्रस्ट म्हणून स्थापन करण्यात आलेली वित्तीय मध्यस्थ संस्था.
- गुंतवणूक योजना तयार करुन गुंतवणूकदार जनतेला युनीट्सची विक्री करतो.
- गुंतवणूकीतून जमा झालेली रक्कम शेअर्स, डिबेंचर्स, बॉन्ड्स मध्ये गुंतवली जाते त्यातून मिळणा(रे नफा)
- लाभांशाच्या रुपात युनिट धारकांना वाटला जातो.

जगात पहिला म्युच्युअल फंड - बेल्जियम - १८२२.
१८६८ मध्ये इंग्लंड → फॉरीन अँड कलोनिअल गव्हर्नमेंट ट्रस्ट फंड

१ जुलै → १९६४ : भारतात सार्वजनिक क्षेत्रातील युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया फंडाची स्थापना - इंग्लंड फंडाच्या धर्तीवर

१९८७ - सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना खुले.
१९८७ : SBI म्युच्युअल फंड - दुसरा
१४ फेब्रु १९९३ - खाजगी क्षेत्रास खुले.
१९९३ - कोठारी पायोनियर - पहिला खाजगी म्युच्युअल फंड
१९९४ - मॉर्गन स्टॅनले हा पहिला परकीय म्युच्युअल फंड
१९९५ - असोशिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (AMFI) या संघटनेची स्थापना

### युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया : UTI.

स्थापना - T.T. कृष्णमाचारी अर्थमंत्री असताना : UTI कायदा 1963
स्थापना - १ जुलै १९६४ या दिवशी सतत मागणी योजना UTI 64 च्या युनिट्सची विक्री.
मुख्यालय - मुंबई

उद्दिष्ट्ये व कार्ये : (1) मध्यम व कमी उत्पन्न गटातील लोकांना बचतीसाठी प्रोत्साहित करणे
(2) औद्योगिकरणाचा फायदा त्यांच्यापर्यंत पोहोचविणे.

UTI च्या अपयशामुळे (अकुशल गुंतवणूक, राजकीय दबाव, शेअर घोटाळा ९१ व २००१)
३१ ऑक्टो २००२ रोजी विभाजन.
२८ ऑक्टो २००२ - UTI कायदा १९६३ रद्द - विकास वित्तीय संस्था दर्जा काढून घेतला.
विभाजन UTI-I व UTI-II मध्ये. - १ फेब्रु २००३ पासून.

UTI-I ↓ US-64 व इतर २१ योजना
UTI-II ↓ NAV आधारीत योजना (Net Asset Value)

UTI-I चे व्यवस्थापन सरकारने नियुक्त केलेल्या प्रशासकाद्वारे 120

UTI-II चे व्यवस्थापन - खाजगी कंपनी द्वारे - सरकारी मदत नाही योजना SEBI च्या नियंत्रणाखाली मालकी LIC, SBI, PNB, BOB कडे - ७५ जाने 2003 निर्णय.

Exchange २००५ मध्ये

## मर्चंट बँका ⇒

गुंतवणूकदार व उद्योजक यामधील वित्तीय मध्यस्थ संस्था:

* गुंतवणूकदारांकडील अतिरिक्त पैसा गरजू उद्योजकांकडे नेण्याचे मध्यस्थ कार्य करतात. मात्र त्या व्यापारी बँका नसतात. त्या जनतेकडून ठेवी स्विकारत नाहीत व कर्ज देत नाही.

कार्य ⇒

① प्रकल्प समुपदेशन: ⇒ ग्राहकांना उद्योग उभारणीस मदत.
उदा. प्रकल्प अहवाल तयार करणे, कायदेशीर बाबींची पूर्तता, प्रकल्प स्थापन करणे, भांडवल उभारणीस मदत इ.

② भाग विमेकरी सेवा ⇒ नवीन शेअर्स व डिबेंचर्सच्या बाबतीत भागविमेकरी सेवा देतात. म्हणजेच बाजारात न विकलेल्या गेलेल्या भागांची खरेदी स्वतः करतात.

③ इश्यू व्यवस्थापन ⇒ शेअर्सची विक्री व्यवस्था पाहणे.

उत्क्रांती: १९६७ - नॅशनल ग्रिन्डलेज बँक, } परकीय बँका - मर्चंट बँकिंग सेवा सुरू.
१९७० - सिटी बँक

१९७२ - SBI ने हा विभाग सुरू केला. त्यानंतर ICICI, BOI, BOB, PNB इ.

स्थापना: पुढील संस्था मर्चंट बँका स्थापन करू शकतात.
i) व्यापारी बँका - आपली संलग्न संस्था म्हणून.
ii) खाजगी वित्तीय सेवा पुरविणाऱ्या कंपन्या.
iii) वित्तीय सल्ला देणाऱ्या व्यक्ती किंवा फर्मस.

नियंत्रण: १९९२ पासून मर्चंट बँका SEBI च्या नियंत्रणाखाली.

## * गृहनिर्माण वित्तपुरवठा - Housing Finance *

यामध्ये HUDCO, HDFC, NHB या संस्थांचा समावेश.

1) भारतीय गृहनिर्माण व नागरी विकास महामंडळ: (Housing & Urban Development Corpo. of India)

HUDCO ⇒ कार्य केंद्रिय नागरी विकास मंत्रालयांतर्गत
स्थापना - २५ एप्रिल १९७० - संपूर्ण भारत सरकारच्या मालकीची.
मुख्यालय - नवी दिल्ली.
कार्य - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना घर बांधण्यासाठी कर्ज.

३) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक - (National Housing Bank)
~~गृहनिर्माण विकास वित्त महामंडळ (Housing Development & Finance Corporation)~~
स्थापना - जुलै १९८८ - RBI च्या संपूर्ण मालकीची संलग्न संस्था.
मुख्यालय - दिल्ली.
स्वरूप: गृहनिर्माण क्षेत्राची सर्वोच्च बँक म्हणून काम

Scanned by CamScanner

कार्य: पुढील संस्थांना गृहबांधणीसाठी पुनर्वित्तपुरवठा. 125
व्यापारी बँका, हुडको, गृहबांधणी कंपन्या, सहकारी गृहबांधणी सोसायट्या, राज्यस्तरीय भूविकास बँका.

३) गृहनिर्माण विकास वित्त महामंडळ (Housing Development & Finance Corporation)
स्थापना - HDFC - १९७७ हसमुख भाई पटेल यांनी केली
भांडवल पुरवठा ICICI कडून
मुख्यालय - मुंबई
कार्य - अल्प व मध्यम गटातील व्यक्ती, सह. संस्था, इ.ना गृहबांधणी दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा.

महाराष्ट्रातील गृहनिर्माण संस्था

① सिडको - (CIDCO - City & Industrial Development Corporation)
⇒ १९६५ मध्ये महाराष्ट्र सरकारने डी आर गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन.
⇒ समितीस मुंबई, पनवेल व पुणे या महानगरांचे प्रश्न तपासण्यास सांगितले.
⇒ समितीने नवी मुंबई शहराच्या निर्मितीची शिफारस.
⇒ नव्या मुंबईच्या निर्मितीसाठी राज्य सरकारने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम अन्वये सिडकोची स्थापना १७ मार्च १९७० रोजी.

② म्हाडा - (MHADA - Maharashtra Housing and Area Development Authority)
महाराष्ट्र सरकारच्या म्हाडा कायदा १९७६ अन्वये १९७७ साली म्हाडाची स्थापना.
प्रमुख उद्दिष्ट नागरी भागातील निवाऱ्याची गरज भागविणे.

* पतदर्जा ठरविणाऱ्या संस्था * (Credit Rating Agencies)

या संस्था संबंधित कंपनीच्या आर्थिक परिस्थितीचा (तिचा व्यवसाय, त्यातील धोके, तिची तिच्या नफ्याचे प्रमाण, भविष्यातील विस्तार योजना) पूर्ण विचार करून तिच्या प्रत्येक पतसाधनांसाठी चिन्हांचा उपयोग करून गुंतवणूकीतील जोखीम सूचित करत असतात.

| | | | |
|---|---|---|---|
| AAA - | सर्वाधिक सुरक्षितता | BB - | असुरक्षित |
| AA - | उच्च —"— | B - | खूप जोखीम |
| A - | पुरेशी —"— | C - | फार मोठी जोखीम |
| BBB - | सुरक्षित | D - | कसुरदार |

भारतातील पतदर्जा ठरविणाऱ्या संस्था:

I) CRISIL - (Credit Rating information services of India Ltd)
⇒ पतदर्जा ठरविणारी पहिली संस्था.
स्थापना - ICICI, HDFC, UTI इ. संस्थांनी १९८७ मध्ये कार्य सुरु १९८८
मुख्यालय - मुंबई

② ICRA - Investment Information & Credit Rating Agency) 126
स्थापना १६ जाने १९९१ - कार्य सुरु १९९१
मुख्यालय - दिल्ली.

③ CARE - (Credit Analysis & Research Ltd)
स्थापना - एप्रिल १९९३ कार्य सुरु १९९३
मुख्यालय - मुंबई

## आंतरराष्ट्रीय पतदर्जा मापन :

आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्या /बँका इ. चा पतदर्जा ठरविणाऱ्या संस्था.

① मुडीज (Moody's) - न्यूयॉर्क - १९०९ : स्थापना जॉन मूडी
② स्टॅंडर्ड अँन्ड पुअर (Standards & Poors) न्यूयॉर्क - मूळ संस्थेची स्थापना हेन्री पुअर यांनी १८६० - १९४१ पासून पतदर्जा मापन महामंडळाचा दर्जा
③ फिच रेटिंग Ltd - (Fitch Rating Ltd) मुख्यालय न्यूयॉर्क व लंडन - जॉन फिच.

## सार्वभौम पतदर्जा :

सरकारच्या पतदर्जाला सार्वभौम पतदर्जा म्हणतात.
सध्या भारताचा पतदर्जा सहा आंतरराष्ट्रीय पतमापन संस्थामार्फत मोजला जातो -
① स्टॅंडर्ड अँड पुअर्स
② मूडीज
③ फिच रेटिंग्ज Ltd.
④ डॉमिनियन बॉन्ड रेटिंग सर्व्हिस - DBRS
⑤ जापनिज क्रेडीट रेटिंग एजन्सी - JCRA
⑥ रेटिंग अँन्ड इन्व्हेस्टमेंट इन्फर्मेशन - टोकियो - R&I.

## हमी संस्था

① भारतीय ठेव विमा व पतहमी महामंडळ :
(Deposite insurance & Credit Guarantee Corporation of India - DICGCI)
बँक व्यवसायात दोन प्रकारच्या जोखीमी :
 ⓘ बँक बुडाल्यास ठेवीचे नुकसान;
 ⓘⓘ कर्जदाराने कर्ज न भरल्यास बँकेचे नुकसान.

ठेवी विमा - १९६१ - ठेवी विमा महामंडळ कायदा : १ जाने १९६२ पासून भारतीय ठेवी विमा महामंडळ स्थापना व कार्य (DICI)

पतहमी - बँकानी दिलेल्या पतपुरवठ्याला हमी देण्यासाठी RBI ने १४ जाने १९७१ रोजी भारतीय पतहमी महामंडळाची स्थापना (CGCI)
१५ जुलै १९७८ पासून दोन्हींचे एकत्रिकरण — मालकी - RBI

Scanned by CamScanner

मुख्यालय - मुंबई.
कामे – ① व्यापारी बँकांना आपल्या ठेवीदारांच्या कमाल १ लाख रु पर्यंतच्या ठेवींचा विमा DICGC कडे काढता येतो त्यासाठी १०० रु मागे प्रति वर्षी ५ रु प्रिमियम.
② बँकांच्या कर्जपुरवठ्याला हमी. लघुउद्योगांना दिलेल्या कर्जासाठी DICGC बँकाकडून वार्षिक १.५% प्रिमियम आकारते. अग्रक्रम कर्जासाठी २.५ टक्क्यांनी प्रिमियम.

② भारतीय निर्यात पत व हमी महामंडळ (Export Credit & Guarantee Corpo. of India ECGC)

निर्यातीतील जोखमी ⟶ ① आयातदाराने पैसे न दिल्यास
② आयातदार आर्थिक डबघाईला आल्यास
③ वाहतुकीचा मार्ग बदलल्याने खर्च वाढल्यास
④ परकीय व्यापार धोरणात बदल झाल्याने निर्यात माल ताब्यात घेताना अडचणी आल्यास.

अशा प्रकारच्या जोखमींना संरक्षण देण्यासाठी भारत सरकारने टी.सी.कपूर समितीच्या शिफारशीनुसार 30 जुलै १९५७ रोजी निर्यात जोखीम विमा महामंडळाची स्थापना (Export Risk Insurance Corporation - ERIC).
त्यासाठी निर्यातदाराला महामंडळाकडे अल्पशी रक्कम भरून विमापत्र घ्यावे लागते.

१५ जाने १९६४ - या महामंडळाचे निर्यात पत व हमी महामंडळ - निर्यात क्षेत्रास वित्त पुरवठा करता यावा म्हणून. (ECGC Ltd)
१९८३ - नाव भारतीय निर्यात पत व हमी महामंडळी. (ECGC I Ltd)
२०१४ — X निर्यात पत व हमी महामंडळ (ECGC Ltd)
मुख्यालय - मुंबई.

कार्ये : i) निर्यातदारासाठी पत जोखीम विम्याची सुविधा
ii) बँकांना व वित्तिय संस्थांना पत जोखीम विमा ⟶ त्यामुळे त्या निर्यातदारा कर्जपुरवठा करतील.
iii) भारतीय बँकांना परदेशी संयुक्त उद्योगामध्ये गुंतवणूक करण्यासाठी परदेशी गुंतवणूक विम्याची सुविधा देणे

## ✱ इतर वित्तिय मध्यस्थ संस्था ✱

① भारतीय शिपिंग पत व गुंतवणूक कंपनी (Shiping Credit & Investment Company of India SCICI)
स्थापना 1986 - सार्वजनिक मर्यादित कंपनी म्हणून
कार्ये - शिपिंग कंपन्या, मत्स्य व्यवसाय व संबंधित उद्योगांना वित्तपुरवठा.
सध्या बंदरे, रोड, वीजनिर्मिती, दूरसंचार इ. पायाभूत क्षेत्रांना —.

② भारतीय पर्यटन वित्त महामंडळ लिमिटेड. (Tourism finance Corporation of India Ltd) TFCI
स्थापना - १ फेब्रु १९८९ – सार्वजनिक मर्यादित कंपनी
कार्य : पर्यटन उद्योगाला वित्तपुरवठा.

Scanned by CamScanner

③ इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग ॲन्ड फायनांशिअल सर्व्हिसेस : IL4FSL (Infrastructure Leasing 4 Financial Services Ltd) 128

स्थापना - १९८८ -

कार्य : पायाभूत उद्योगांना (Leasing) भाडेपट्टी करारावर साहित्य उपकरणे पुरविणे तसेच इतर वित्तिय सेवा पुरविणे.

सेंट्रल बँक + HDFC + UTI यांनी एकत्र येवून सुरु केलेली सरकारची कंपनी. (खाजगी मर्यादित)

यामध्ये मित्सुबुशी - Orix Corporation Japan. } परकीय
अबुधाबी इन्व्हेस्टमेंट ॲथोरिटी
LIC -
हे सर्वात मोठे भागधारक.
2017 पर्यंत थोडा वाटा SBI चा पण होता.

या कंपनीने ज. काश्मीर मधील चेनानी नशरी ह्या बोगद्यासाठी आर्थिक सहाय्य NH44 - भारतातील सर्वात (9.28Km) मोठा.

सध्या IL4FSL - हा 256 कंपन्यांचा गट

सध्या LIC = 25%
ORIX = 23%
IL4FS Welfare = 12%
AbuDhabi = 12%
HDFC = 9%
Central Bank = 7%
SBI = 6%

मुख्यालय - मुंबई
CEO - अरुण के साहा.

④ व्हेंचर कॅपिटल फंड्स -

अशा तंत्रज्ञ उद्योजकांना वित्तिय मदत करतात
ज्यांच्याकडे तांत्रिक कौशल्य आहे
नफा कमविण्याची क्षमता आहे
मात्र उद्योग सुरु करण्यास सुरुवातीचे भांडवल नाही.

अशा भांडवलास जोखीम भांडवल

भांडवल पुरवणाऱ्या संस्थांना व्हेंचर कॅपिटल फंड्स असे म्हणतात.

अशा संस्था बँकविषयक, तांत्रिक, नियोजन विषयक, व व्यवस्थापकीय सल्ला देतात.

नियंत्रण : सेबी मार्फत.

भारतातील काही प्रमुख फंड्स :
i) ICICI Venture funds Ltd.
ii) IFCI Venture Capital funds Ltd.
iii) SIDBI Venture Capital Ltd.
iv) SBI Capital Market Ltd.
v) Canbank Venture Capital Ltd.

Scanned by CamScanner

# * गैर बँकिंग वित्तिय संस्था *

## ( Non-Banking finance Institutions)

⇒ बँकाप्रमाणे ठेवी स्विकारण्याचा व कर्जे देण्याचा व्यवसाय करणाऱ्या मात्र बँक नसलेल्या संस्थांना गैर बँकिंग वित्तिय संस्था असे म्हणतात.

या संस्थांचे दोन गट:

① आखिल भारतीय वित्तिय संस्था: (All Banking Financial Institutions - ALFI's)

सध्या RBI च्या नियंत्रणाखालील चार - ALFI's

- ⇒ ① भारतीय आयात निर्यात बँक (EXIM Bank of India)
- ⇒ ② राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (NABARD)
- ⇒ ③ राष्ट्रीय गृहनिर्माण बँक (NHB)
- ⇒ ④ भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI)

② गैरबँकिंग वित्तिय कंपन्या: (Non-Banking financial Companies · NBFC's)

कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणी: ⇒ कर्जे व अग्रीमांचा व्यवसाय

⇒ शेअर्स / स्टॉक्स / डिबेंचर्स / रोखे यांचे संपादन

⇒ लिझिंग.

⇒ विमा व्यवसाय

⇒ वस्तू खरेदी विक्री.

व्यवसायानुसार प्रकार: 1) मालमत्ता वित्त कंपनी

2) गुंतवणूक कंपनी

3) पायाभूत संरचना वित्त कंपनी

4) सुक्ष्म वित्त संस्था.

व्यवसाय: व्यापारी बँकेप्रमाणेच: मात्र पुढील फरक,

i) मागणी ठेवी स्विकारु शकत नाही: (१२ ते ६० महिन्यांसाठी - समंती)

ii) निरसन व्यवस्थेचा भाग असत नाही. त्यामुळे स्वतः वर चेक काढू शकत नाही.

iii) त्यांच्या ठेवींना DICGCI ची ठेवी विम्याची सुविधा प्राप्त होत नाही.

प्रकार दोन.

① ठेवी स्विकारणाऱ्या - ( Deposit taking · NBFC-D )

② ठेवी न स्विकारणाऱ्या (Non-deposit taking - NBFC-Nd )

(त्यापैकी ५०० कोटी अधिक मालमत्ता असणाऱ्या. Systemetically Important NBFC-ND-SI )

गैर बँकिंग कंपन्या RBI ने सांगितलेल्या महत्तम दरापेक्षा अधिक व्याजदर देवू शकत नाही. सध्याचा दर १२.५%.

तसेच ठेवीदारांना लाभ / सुविधा / गिफ्ट देवू शकत नाही.

Scanned by CamScanner